# 'मार्ड'च्या डॉक्टरांची अरेरावी सुरू झाली तुमचा डॉक्टर कसा वागला तपासले का?

संपादकीय

सौ. जयश्री खाडिलकर-पांडे
सादर करीत आहेत

'मार्ड'च्या चार हजार निवासी डॉक्टरांनी राज्यभरात बेमुदत संप सुरू केला आहे. सोलापूरच्या सिव्हील रुग्णालयात निवासी डॉक्टर प्रशांत पाटील यांना सोलापूरच्या फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक अरुण वायकर यांनी मारले. याच्या निषेधार्थ मार्डने लगेच संपाचे हत्यार उगारले. मार्डने ही अरेरावी ताबडतोब बंद करायला हवी. डॉक्टरांनी हा संप मागे घेतला नाही तर सरकारने हा संप अत्यंत कठोरपणे मोडून काढायला हवा. सामान्य माणसांची ही अत्यंत आग्रहाची मागणी आहे. डॉक्टरांनी त्यांच्या रास्त मागण्यांसाठी संप करावा, पण उठसूट संप कसले करता? आता मारहाण झाली म्हणून संप पुकारला, पण वैद्यकीय सेवा ठप्प करणे पूर्ण अयोग्य आहे. आता तर 'मार्ड' प्रत्येकवेळी हत्यारासारखा संपांचा वापर करू लागला आहे.

डॉक्टरांना मारहाण होण्याच्या घटना का घडतात. याचा डॉक्टर कधी विचार करणार आहेत की नाही? खाजगी असो वा पालिका, सिव्हील रुग्णालय असो त्यातील बहुसंख्य डॉक्टर उत्तम आहेत, पण त्यांच्यातील अनेक डॉक्टर हे उद्धट असतात, अनेक डॉक्टर जबाबदारीने ड्युटी पार न पाडता काम चुकविण्याचा प्रयत्न करतात, नातेवाईकांच्या प्रश्नांना उडवाउडवीची उत्तरे देतात, रुग्णावर त्वरित उपचार करीत नाही, रुग्ण तासन्तास स्ट्रेचरवर पडून असतो, एक सलाईनची बाटली संपल्यावर दुसरी बाटली लावायलाही दोन तास लावतात. सामान्य आणि गरीब रुग्णांना सतत हा अनुभव येतो. यातूनच डॉक्टरबद्दल चीड निर्माण होते आणि ही चीड वाढत जाऊन आता डॉक्टरांना मारहाण होऊ लागली आहे. ही जी सत्य परिस्थिती आहे त्याला मार्ड काय उत्तर देणार आहे?

सोलापुरात डॉक्टरला मारहाण होतानाचा व्हिडिओ अगदी लगेच सर्व वाहिन्यांना पोचविण्यात आला. त्याच तत्परतेने पोलीस निरीक्षक अरुण वायकर यांचे म्हणणे ऐकून घेण्याची तसदी मार्डच्या नेत्यांनी केली का? ज्याला मारहाण झाली ते डॉ. प्रशांत पाटील म्हणतात की, ते डोक्याला दुखापत झालेल्या एका रुग्णाला सीटीस्कॅनसाठी घेऊन जात होते म्हणून त्यांनी गेटवर पडलेल्या रुग्णाला बघितले नाही. आता या डॉक्टर साहेबांनी खरे सांगावे. या डॉक्टरांनीच वाहिन्यांना जो मारहाणीचा व्हिडिओ दिला त्या व्हिडिओत डॉक्टरच्या पाठीवर हॅवरसॅक (बॅग) असल्याचे स्पष्ट दिसते आहे. डॉक्टरने इतकेच सांगावे की, बाबारे, पाठीवर हॅवरसॅक घेऊन आपण रुग्णालयात ड्युटी करीत होता का? पाठीवर हॅवरसॅक घेऊन आपण रुग्णाला सीटी स्कॅनला नेत होता का?

पोलिसांचे म्हणणे आहे की, या रुग्णालयाच्या गेटजवळ एक महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. ती जोरजोरात किंचाळत होती. तिचे किंचाळणे ऐकून पोलीस निरीक्षक वायकर, उपनिरीक्षक चौगुले आणि ऑपरेटर सुरवसे हे तिघे धावले. महिलेची स्थिती पाहून ते डॉक्टरला बोलवायला रुग्णालयात आले तेव्हा काऊंटरवर कुणी नव्हते. आणखी एक दोन विभागातही डॉक्टर नव्हते. तिघे सीटीस्कॅन विभागात आले तिथे डॉ. प्रशांत पाटील दिसले. त्यांनी डॉक्टरांना महिलेला तपासण्याची विनंती केली, पण डॉ. प्रशांत पाटीलनी मदत केली नाहीच तर उद्धटपणे बोलले. मी दिवसभर ड्युटी केली आता मी ड्युटीवर नाही, मी सर्जन आहे मी येत नाही, मी काय करायचे ते तुम्ही मला शिकवणार का, गायनॅक वॉर्डला जा, तिथला नंबर मी पाठ करायचा का, हा तुझा सिनीअर असेल माझा नाही, अशी डॉ. प्रशांत पाटील यांची अरेरावी सुरू होती. काही पावलांवर ती महिला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती आणि डॉक्टरची ही बडबड सुरू होती. शेवटी पोलिसांनी त्याचा दंड धरून त्याला महिलेकडे नेण्याचा प्रयत्न केला तेव्हा झटापट झाली.

आता मार्डच्या नेत्यांनीच सांगावे की, पोलिसांनी काय करायला हवे होते? त्या महिलेला मरायला सोडून निघून जायला हवे होते का? मार्डने या बाबी तपासायला हव्यात. पण काही झालं की लगेच संप पुकारायचा हा एक कलमी कार्यक्रम सुरू असतो. जनता तुम्हाला का मारते याचा डॉक्टरांनी बसून विचार करायला हवा. आता तर पोलीसही तुमच्यावर संतापू लागले आहेत.

गृहमंत्री आर. आर. पाटील यांचा तर शंभरवेळा धिक्कार आहे. पोलिसांच्या बाजूनी उभे राहण्याऐवजी त्यांना तडकाफडकी निलंबित केले. आता 'मार्ड' म्हणते त्यांना अटक करा, तर अटकही करणार का? अरुण वायकरना तुम्ही निलंबित केले. त्यांना उत्कृष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक मिळाले आहे. या पोलिसांच्या पाठीमागे आबा खंबीरपणे कधीच उभे राहणार नाही का? पोलिसांना निलंबित करता त्याप्रमाणे डॉक्टर दोषी आढळला तर त्याच्यावर कडक कारवाई करण्याची धमक शासनाने दाखवावी. सामान्य जनता अभेद्य भिंतीप्रमाणे यासाठी शासनाच्या पाठिशी उभी राहील.